**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

**वर्ष ११, अंक १२(१७)]** **शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XLIX OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४९.**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०

ज्याअर्थी, यात पुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे.

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

सन १९६५ चा नाव महाराष्ट्र अधिनियम क्र.२ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम ४८ पोट-कलम (१) मधील विद्यमान परंतूकाऐवजी खालील परंतूक दाखल करण्यात येईल :-

"परंतु, जागा रिकामी झाल्यापासून दोन वर्षाच्या आत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार असतील तर, तात्पुरती रिकामी झालेली जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही किंवा त्याजागी कोणाचे नामनिर्देशन करण्यात येणार नाही."

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अंतर्गत परिषद सदस्य ची जागा रिकामी झाल्यापासून सहा महिन्याच्या आत सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार असतील तर तात्पुरती रिकामी जागा भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही किंवा त्याजागी कोणाचे नामनिर्देशन करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

केवळ सहा महिन्यासाठी एखादा सदस्य निवडून आला तर त्याला लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना पुरेसा कालावधी मिळणार नाही, पर्यायाने विकास प्रक्रियेत अवरोध निर्माण होईल. याशिवाय निवडणूक घेण्याच्या प्रक्रियेतही शासनाच्या पैश्याचा तसेच वेळेचा अपव्यय होईल. त्यामुळे सदर कलमात अंतर्भुत केलेला सहा महिन्याचा कालावधी वाढवून दोन वर्षांचा करणे आवश्यक आहे. त्यामुळे या निर्णयाचा गांभीर्यपूर्वक फेरविचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील उद्दीष्ट्ये साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ मे २०२५

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य,

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानभवन.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.